# उल्हासनगर महानगरपालिका

## नगररचना विभाग

## !! जाहीर आवाहन !!

उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधीन करणे अधिनियम-२००६ व सुधारीत २०२३ नुसार उल्हासनगर शहरातील दिनांक ०१/०१/२००५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे नियमित करावयाचे आहेत.

उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे उल्हासनगर शहरातील सर्व मिळकत धारकांना सदर अधिनियमासोबत असलेल्या नियमावलीतील विहित नमुना ‘अ’ मध्ये अर्ज करण्यासाठी नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

सदर नोटीसचा हेतु शहरातील अनधिकृत बांधकाम असलेल्या मिळकत धारकांना त्यांचे बांधकाम नियमित करण्याची संधी देणे हा आहे. **परंतु ज्यांचे बांधकाम नियमित असेल किंवा ज्यांनी आधीच बांधकाम परवानगी घेतली असेल त्यांनी नियमितीकरणासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.** केवळ आपले बांधकाम अधिकृत असल्याचे व बांधकाम परवानगी प्राप्त असल्याचे महानगरपालिकेतील नगररचना कार्यालयास अवगत करावे.

शहरातील अनधिकृत बांधकाम नियमित करण्याची इच्छा ज्या मिळकतधारकांची आहे, त्यांनी सदर नियमावलीतील प्रपत्र ‘ब’ आणि ‘क’ मध्ये भरुन त्यांचे बांधकाम नियमित करण्यासाठी महानगरपालिकेच्या तज्ञ समिती विभागाकडे अर्ज सादर करावा. त्यांना लागणारी संपूर्ण मदत तज्ञ समितीकडून करण्यात येईल. त्यानंतर अर्जाची छाननी होऊन फक्त रू. २२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे प्रशमन शुल्क आकारण्यात येऊन संबंधीतांना ‘D’ form देण्यात येईल.

तसेच, तज्ञ समिती विभाग फक्त अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत मिळकतधारक/अर्जदारांकरीता शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी सुरु ठेवण्यात येणार आहे.

तरी, या सुवर्ण संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

(ल.मु.खोब्रागडे)
सहा. संचालक, नगररचना
उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र.उमपा/नरवि/~~तस~~ सा/ २७२/२०२३ ,दिनांक:०३ /११/२०२३